# संगीत कला विहार

जून :- २०१६ वर्ष :- ६९ अंक :- ६

## अनुक्रमणिका

पृष्ठ क्रमांक


- संपादकीय ... ... ५
- भेंडी बाजार घराण्याला नव संजीवन देणारे तपस्वी गायक आणि सिद्धहस्त गुरु पं. त्र्यंबकराव जानोरीकर ... ... पंडिता डॉ. सुहासिनी कोरटकर ७
- संतकवी सूरदासांच्या पदातील ''भावसौंदर्य आणि नृत्य लाघव'' ... ... सौ. मंजिरी देव १३
- उत्तर भारतीय संगीतमध्ये लय - ताल यांचे मानसशास्त्रीय अंग ! ... ... डॉ. चेतना बनावत १७
- सुरांचे जेव्हा पद होते ... ... डॉ. डी. बी. क्षीरसागर २२
- व्हायोलिनचे मर्मज्ञ व बंदिशकार पंडित नारायण पंडित ... ... चैतन्य कुंटे २४
- राग वर्गीकरण : एक पुनर्विचार ... ... डॉ. पौर्णिमा धुमाळे २६
- तालबंदी संगीत ... ... प्राजक्ता हसबनीस ३१
- राग : अडाना ... ... डा. हेमराज चन्देल 'राजरंग' ३३
- राग : चन्द्रकौंस - तराना एकताल (द्रुत) ... ... डा. एच. के. सलूजा ३५
- राग : शिवमत भैरव ... ... श्री. हेमन्त गन्धर्व ३६
- राग : आसावरी ... ... कु. श्रीपान्शी चन्द्र ३७
- संगीत संसार के समाचार ... ... ३८
- रजिस्ट्रार कार्यालय समाचार ... ... ४७
- गुजराथी विभाग : पंडित बळवंतराव गुलाबराय लट्टू 'लावरंग' 'वाग्येकार' ने श्रद्धांजलि ... ... श्री. धरमशी शाह ५३


मुखपृष्ठ : स्व. पं. टी. डी. जानोरीकर

इस पत्रिका में प्रकाशित लेखकों के विचारों से संपादक तथा मंडल का सहमत होना आवश्यक नहीं हैं।

मूल्य : रू. ३०/-



Scanned by TapScanner

# व्हायोलिनचे मर्मज्ञ व बंदिशकार पंडित नारायण पंडित

– चैतन्य कुंटे

ज्येष्ठ व्हायोलिनवादक, बंदिशकार, 'व्हायोलिन' या ग्रंथाद्वारे मराठी भाषेतील वाद्यविषयक साहित्यामध्ये मोलाची भर घालणारे पं. नारायण पंडित यांचा जन्म दि. २३ जून १९२९ रोजी कर्नाटकातील गोकर्ण क्षेत्री वडिल विघ्नेश्वर शास्त्री व आई ललिताबाई या दांपत्याच्या पोटी, दोन भाऊ व एक बहिण अशा परिवारात झाला. गुणवंतेश्वर या कर्नाटकातील लहानशा गावी त्यांचे वैदिकी करणारे पूर्वज होते. ज्योतिषशास्त्रावरचा 'मुहूर्तमाधवी' हा मूलभूत ग्रंथ त्यांच्या पूर्वजांनी लिहिला होता. त्यांचे मामा गोकर्ण येथे वैदिकी करत व चारही वेद मुखोद्गत असणारे शास्त्री म्हणून त्यांची ख्याती होती. वडिल पं. विघ्नेश्वर शास्त्री हेही वैदिकी करत असत. अशा विद्यासंपन्न कुलात नारायण पंडित यांचा जन्म झाला.

इथे नारायण पंडित यांचे पिता व गुरु पं. विघ्नेश्वर शास्त्री यांच्याविषयीही थोडी माहिती देत आहे. कर्नाटकातील प्रसिध्द व्हायोलिनवादक 'फिडल कृष्णराव' यांच्याकडून विघ्नेश्वर शास्त्रींनी व्हायोलिनवादनाचे शिक्षण घेतले व ते मुंबईत आले. प्रा. बा. र. देवधर यांच्या 'देवधर स्कूल ऑफ म्युझिक'मध्ये ते व्हायोलिनवादन शिकवू लागले व देवधरांच्या सहवासात त्यांनी हिंदुस्थानी संगीतप्रणालीस अनुकूल अशी व्हायोलिनवादनाची रीत विकसित केली. पं. विघ्नेश्वर शास्त्रींनी पं. व्ही. जी. जोग, पं. डी. के. दातार असे उत्तमोत्तम व्हायोलिनवादक घडवून हिंदुस्थानी संगीतास मोठेच योगदान दिले आहे. १९८० साली वयाच्या ८० व्या वर्षी पं. विघ्नेश्वर शास्त्रींचे मुंबईत निधन झाले.

नारायण पंडित यांचे बिगरी ते एच्. एस्. सी. पर्यंत शिक्षण मुंबईतील राममोहन हायस्कूल येथे झाले, नंतर विल्सन कॉलेजमधून राज्यशास्त्र व अर्थशास्त्रात त्यांनी बी. ए. पदवी प्राप्त केली. तसेच शासकीय विधी महाविद्यालयातून एल्. एल्. बी. ची पदवीही त्यांनी संपादन केली. मुंबईच्या हायकोर्टात सुमारे ३५ वर्षे त्यांनी सफलतेने वकिली केली.

आपले वडिल पं. विघ्नेश्वर शास्त्री यांच्याकडूनच पं. नारायण पंडित यांनी व्हायोलिनवादनाचे तंत्र आत्मसात केले. तसेच 'देवधर स्कूल ऑफ म्युझिक'मधे त्यांच्यावर ग्वाल्हेर, आग्रा व जयपूर गायकीचे खोल संस्कार झाले. पं. रत्नाकर पै, डॉ. अशोक दा. रानडे या मित्रांच्या सांगीतिक सहवासाचाही त्यांना लाभ झाला. नाना कलाकारांकडून घराणेदार बंदिशींचा संग्रह त्यांनी केला. पं. ओंकारनाथ ठाकूर, उ. बडे गुलाम अली खां, पं. बापूराव पलुसकर, इ. अनेक कलाकारांना त्यांनी अनेक मैफलींत व्हायोलिनची दर्जेदार साथसंगतही केली. मात्र त्यांच्या एकूणच सांगीतिक व्यक्तित्त्वावर सर्वाधिक प्रभाव पडला पं. कुमार गंधर्व यांचा. पं. कुमार गंधर्व यांना त्यांनी अनेक वर्षे साथही केली. कुमारजींचा सहवास व मार्गदर्शन त्यांना दीर्घ काळ मिळाले ज्याद्वारे त्यांची सांगीतिक घडण अधिक संपन्न





झाली. त्यांनी व्हायोलिन वादनाचे स्वतःचे असे वेगळे तंत्र विकसित केले व एकल व्हायोलिन वादनाच्या मैफलीही केल्या.

नारायण पंडित यांचे मित्र व ज्येष्ठ संगीतज्ञ डॉ. अशोक दा. रानडे यांच्या आग्रहामुळे व सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळे पंडितांनी 'व्हायोलिन' हा ग्रंथ लिहिला. नारायण पंडित यांनी अत्यंत मेहनतीने, वर्षानुवर्षांच्या रियाज, चिंतन व अभ्यासाद्वारे हा ग्रंथ सिध्द केला. महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळाने १९७४ साली प्रकाशित केलेला हा ग्रंथ मराठी भाषेतील व्हायोलिन या विषयावरचा प्रमाणग्रंथ मानला जातो. व्हायोलिन या वाद्याचा इतिहास, वाद्यनिर्मिती, वाद्याचे ध्वनिशास्त्र, वाद्याची निगा राखणारी पध्दत, वादनतंत्र व शैली, विविध वादकांचे योगदान, व्हायोलिनवादनास अनुकूल असणाऱ्या बंदिशींचे स्वरलेखन असे अनेक विषय साक्षेपाने मांडल्याने हा ग्रंथ परिपूर्ण बनला आहे. त्यांचे साडू ब्रिगेडिअर एस्. जी. भागवत यांनी त्यांच्या 'व्हायोलिन' या ग्रंथाचा कन्नड भाषेत अनुवाद केला आहे, मात्र तो अद्याप अप्रकाशितच आहे.

आपल्या उत्तरायुष्यात, पत्नीच्या निधनानंतर नारायण पंडित यांनी मुंबई सोडली व पुन्हा आपल्या जन्मभूमीत, कर्नाटकात ते स्थायिक झाले. या परिपक्व अवस्थेत स्पर्धा, ईर्ष्या व लोभाच्या संसर्गाने ग्रासलेल्या व्यावसयिक जगाच्या विळख्यापासून दूर राहून कर्नाटकातील निसर्गसमृध्द, शांत भूमीत आज वयाच्या ८७ वर्षी, आपल्या शारीरिक अस्वास्थ्यावर मात करुन ते अत्यंत उत्साहाने संगीताचे चिंतन व अध्यापन यांत कार्यरत आहेत. वयाच्या साठीनंतर वादनापेक्षा गायनाकडे त्यांनी लक्ष केंद्रित केले. कुमारजींच्या ढंगाची, पण स्वतःच्या विचारांतून निर्माण झालेली त्यांची स्वतःची खास अशी गायनशैली आहे. या गायनशैलीस अनुरुप अशा शंभर–दीडशे ढंगदार बंदिशीही त्यांनी रचल्या आहेत.

'नादपिया' या नाममुद्रेने त्यांनी रचलेल्या या बंदिशींतील रागविचार, लयसौंदर्य फारच मोहक आहे. (पं. वि. रा. आठवले यांनीही याच नाममुद्रेने बंदिशी बांधल्या, हा केवळ योगायोग!) तसेच बंदिशींच्या काव्यपक्षाविषयी त्यांचे विचार महत्त्वाचे असून त्यांच्या बंदिशींतील काव्यगुणही लक्षवेधी आहेत. ख्याल, ध्रुपद, टप्पा, ठुमरी, सरगम, तराना, बामायना बंदिशी अशा अनेक संगीतप्रकारांत त्यांनी बंदिशी केल्या आहेत. टप्पा या शैलीबद्दलही त्यांचा खास विचार असून टप्पा अंगाचे ख्याल व तराणेही त्यांनी रचले आहेत. त्यांच्या या रेखीव व नादमधुर बंदिशींचा संग्रह २०१० साली कर्नाटक विद्यापीठातर्फे कन्नड भाषेतून प्रसिध्द झाला. आजही धारवाड, उडुपी भागातील अनेक होतकरु संगीताभ्यासकांस पंडितजी मार्गदर्शन करून आपला सौंदर्यपूर्ण संगीतविचार पुढच्या पिढीपर्यंत पोचवत आहेत.

– चैतन्य कुंटे

**डॉ. बालमुरलीकृष्णन्**

**मी उत्स्फूर्त गातो'' हे उद्गार आहेत, प्रसिद्ध गायक डॉ. बालमुरलीकृष्णन् यांचे ! डॉ. बालमुरलीकृष्णन् यांनी कोणाकडेच रीतसर असे संगीताचे शिक्षण घेतले नाही. वडील शिष्यांना शिकवत ते आडून आडून ऐकून त्यांनी संगीताचे शिक्षण घेतले.**

**वयाच्या आठव्या वर्षी डॉ. बालमुरलीकृष्णन् यांनी पहिला जाहीर कार्यक्रम केला. गमतीची गोष्ट अशी की, वयाच्या १२/१३ व्या वर्षी ते गाणं शिकवीत असत आणि शिकायला येणारे शिष्य होते २५/३० वर्षे वयाचे!**